# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.11.2025** **वारःबुधवार**

---

•बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचार संपला;
१८ जिल्ह्यांमधील १२१ विधानसभा मतदारसंघांमध्ये उद्या मतदान.

•नऊ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षणाचा दुसरा टप्पा आजपासून सुरू .

• भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध मजबूत करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांच्या दृढ वचनबद्धतेला व्हाईट हाऊसचा दुजोरा

•इफको आणि अमूल या भारतीय सहकार क्षेत्रातील कंपन्यांच्या कामगिरीची जागतिक स्तरावर नोंद आणि

•फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत भारतीय खेळाडूंची विजयी वाटचाल

**<u>बिहारविधानसभ</u>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचार काल संध्याकाळी संपला. या टप्प्यातील मतदान उद्या १८ जिल्ह्यांमधील १२१ विधानसभा मतदारसंघांमध्ये होणार आहे. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी, एनडीए आणि महाआघाडीच्या नेत्यांनी त्यांच्या पक्षाच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ मतदारांना आकर्षित करण्यासाठी शेवटचे प्रयत्न केले. पहिल्या टप्प्यात, एकंदर एक हजार ३१४ उमेदवारांचे राजकीय भवितव्य तीन कोटी ७५ लाखांहून अधिक मतदार ठरवणार आहेत. पहिल्या टप्प्यात नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारमधील १६ मंत्र्यांचे राजकीय भवितव्य पणाला लागणार आहे, त्यापैकी ११ भाजपचे आहेत. भाजपकडून उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि विजय कुमार सिन्हा हे अनुक्रमे तारापूर आणि लखीसराय मतदारसंघातून निवडणूक लढवणाऱ्या प्रमुख उमेदवारांमध्ये आहेत. महाआघाडीचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी प्रसाद यादव हे राघोपूर विधानसभा मतदारसंघातून तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत. पहिल्या टप्प्यासाठी निवडणूक आयोगाने कडक सुरक्षा व्यवस्था केली आहे. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, पहिल्यांदाच प्रत्येक मतदारसंघात एक निरीक्षक तैनात केला जाणार असून निवडणूक प्रक्रियेवर बारकाईनं लक्ष ठेवण्यासाठी सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग केले जाईल. पुरेशा प्रमाणात केंद्रीय सशस्त्र पोलिस दल देखील तैनात केले जाईल.

**<u>निवडणूकआयोग</u>**

निवडणूक आयोगानं नवी दिल्लीतल्या इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डेमोक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट इथं आंतरराष्ट्रीय निवडणूक अभ्यागत कार्यक्रम सुरू केला आहे. या अंतर्गत उद्या होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात फ्रान्स, दक्षिण आफ्रिका, बेल्जियम, इंडोनेशिया, फिलीपिन्स, थायलंड आणि कोलंबियासह सात देशांतील एकंदर १४ प्रतिनिधी मतदान प्रक्रिया पाहतील.हा आंतरराष्ट्रीय निवडणूक अभ्यागत कार्यक्रम इतर देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्था आणि आंतरराष्ट्रीय संघटनांसोबतचं सहकार्य वाढविण्यासाठी
निवडणूक आयोगाचा एक प्रमुख कार्यक्रम आहे.

**SIR-एनओए**

मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षणाचा दुसरा टप्पा आजपासून नऊ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू झाला आहे. मतदार यादीचे मोठ्या प्रमाणात पुनरीक्षण पुढील वर्षी ७ फेब्रुवारीला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर संपेल. एसआयआरच्या नवीन टप्प्यात छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, मध्य प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, पुडुचेरी, लक्षद्वीप, अंदमान आणि निकोबार बेटे यांचा समावेश असणार आहे. या राज्यांमध्ये ३२१ जिल्हे आणि १ हजार ८४३ विधानसभा मतदारसंघ आहेत. यापैकी तामिळनाडू, पुदुच्चेरी, केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये पुढील वर्षी विधानसभा निवडणुका होणार आहेत.

**भारत-इस्राइलकरार**

भारत आणि इस्राइल दरम्यान संरक्षण क्षेत्रातील संबंधांची व्याप्ती वाढवण्यासाठी उभय देशांदरम्यान सामंजस्य करार करण्यात आला. संयुक्त कार्यगटाच्या काल झालेल्या 17व्या बैठकीत, भारताचे संरक्षण सचिव राजेश कुमार आणि इस्राएलि संरक्षण मंत्रालयाचे महासंचालक मेजर जनरल अमीर बराम यांनी या करारावर स्वाक्षरी केली. या करारामुळे प्रगत तंत्रज्ञानाची देवाणघेवाण शक्य होणार असून, सह-विकास आणि सह-उत्पादनाला चालना मिळेल. दोन्ही देशांमधील मजबूत असलेलं संरक्षण सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी हा करार एकात्मिक दृष्टिकोन आणि धोरणात्मक दिशा प्रदान करेल.

**भारत-अमेरिका**

अमेरिकेकडून लादण्यात आलेलं व्यापार शुल्क आणि रशियाकडून तेल आयातीच्या मुद्यावरून सुरू असलेला तणाव असूनही, अमेरिका आणि भारत यांच्यातील संबंध मजबूत करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांच्या दृढ वचनबद्धतेला व्हाईट हाऊसनं पुन्हा एकदा दुजोरा दिला आहे. माध्यम मंत्री कॅरोलिन लेविट म्हणाल्या की अमेरिकेचे अध्यक्ष या भागीदारीला खूप महत्त्व देतात आणि अलीकडेच व्हाईट हाऊसमध्ये दिवाळी उत्सवादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी त्यांनी चर्चा केली, त्यावेळी वरिष्ठ भारतीय-अमेरिकन अधिकारी उपस्थित होते. तसंच भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर आणि ट्रम्प यांचे व्यापारी शिष्टमंडळ भारतासोबत चर्चा करत असून अमेरिकेचे अध्यक्ष यांचा मोदींबद्दल आदर आणि त्यांच्यातील संवाद सातत्यावर भर देत आहेत असंही कॅरोलिन लेविट यांनी सांगितलं.

**<u>सहकार</u>**

इफको आणि अमूल या भारतीय सहकार क्षेत्रातील कंपन्यांनी जागतिक स्तरावरील अग्रगण्य सहकारी संस्था यादीत स्थान पटकावलं आहे. इंटरनॅशनल कोऑपरेटिव्ह अलायन्स वर्ल्ड कोऑपरेटिव्ह मॉनिटरनं ही यादी जाहीर केली आहे. कतारमधील दोहा इथं झालेल्या कार्यक्रमात ही यादी जाहीर करण्यात आली. ग्रामीण स्वावलंबन आणि सामूहिक मालकीच्या भावनेवर उभारण्यात आलेल्या अमूल संस्थेनं लाखो शेतकऱ्यांचे जीवनमान बदलले आहे हे या मान्यतेवरून पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे. तर इफकोची कामगिरीही उल्लेखनीय असून शाश्वत खत उत्पादन, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि पर्यावरणीय व्यवस्थापनाद्वारे इफकोनं लाखो शेतकऱ्यांना सक्षम करून सहकार्याच्या तत्त्वांना मूर्त रूप दिलं आहे.

**<u>फिलिपाईन्स-चक्रीवादळ</u>**

फिलिपाईन्सच्या मध्यवर्ती भागाला ‘कालमाएगी’ या जोरदार चक्रीवादळचा तडाखा बसला आहे. या वर्षातील सर्वात प्रचंड मानल्या जाणाऱ्या या चक्रीवादळाच्या प्रभावामुळे या प्रदेशात पूर आल्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. आतापर्यंत 40 जणांनी आपला जीव गमावला असून लाखो नागरिक विस्थापित झाले आहेत. लष्कराने बचावकार्य सुरू केलं असून, बचावकार्य करताना पथकातील हेलिकॉप्टर कोसळून 6 जण मृत्युमुखी पडले. या चक्रीवादळचा जोर काहीसा कमी झाला असला तरीही अद्याप या भागात ताशी 130 किलोमीटर वेगाने वारे वहात आहेत.

**<u>पीएलआय</u>**

केंद्रीय पोलाद मंत्री एच.डी. कुमारस्वामी यांनी काल नवी दिल्लीत विशेष पोलाद उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेच्या तिसऱ्या फेरीचं उद्घाटन केलं.६ हजार ३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या या योजनेचा उद्देश सुमारे २६ दशलक्ष टन विशेष पोलाद क्षमता समाविष्ट करणं हा असल्याचं कुमारस्वामी यावेळी म्हणाले.

**<u>गुरुनानकजयंती-पूल-सविता</u>**

शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक यांची आज 5 शे 56 वी जयंती आहे. यालाच गुरु पुरब असेही म्हणतात. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी शीख बांधवांना गुरुनानक जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु नानक यांचं जीवन आपल्याला सत्य, न्याय आणि सहिष्णुता या मूल्यांची शिकवण देतं; प्रत्येकाने गुरु नानक देव यांचे आदर्श आपल्या जीवनात आत्मसात करावे आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यासाठी त्यांनी दाखवलेल्या मार्गाचे अनुसरण करावे असं आवाहनही राष्ट्रपति मुर्मू यांनी आपल्या संदेशात केलं आहे.दरम्यान गुरु नानक जयंती निमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजंन करण्यात आलं आहे.

**<u>अपघात-एनओए</u>**

छत्तीसगडमध्ये बिलासपूरजवळ काल संध्याकाळी झालेल्या रेल्वे अपघातात सहा जणांना आपले प्राण गमवावे लागले आणि सुमारे वीस जण जखमी झाले आहेत. एका प्रवासी रेल्वेची थांबलेल्या मालगाडीशी टक्कर होऊन ही दुर्घटना घडली. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. दरम्यान,

मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी १० लाख रुपये, गंभीर जखमींना ५ लाख रुपये आणि किरकोळ जखमींना एक लाख रुपये सानुग्रह अनुदान रेल्वेनं जाहीर केले आहे. तसंच रेल्वे सुरक्षा आयुक्तांमार्फत या घटनेची सविस्तर चौकशी करण्याचा निर्णयही रेल्वेनं घेतला आहे.

**तेलंगण**

तेलंगण राज्य सरकार तेलंगण आर्टिफिशियल इंटेलिजेंस इनोव्हेशन केंद्र स्थापना करणार असल्याची घोषणा राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि उद्योग मंत्री डी. श्रीधर बाबू यांनी केली. हे केंद्र हैदराबादमध्ये स्थापन करण्यात येणार असून उदयोन्मुख तंत्रज्ञानातील संधींचा अधिकाधिक फायदा घेण्यासाठी उपाययोजना सुलभ करण्यावर राज्याचा भर आहे, असं मंत्र्यांनी सांगितलं. हे केंद्र अनेक क्षेत्रांमध्ये एआय-आधारित नवोपक्रम, संशोधन आणि सहकार्यासाठी केंद्रबिंदू म्हणून काम करेल.

**उपराष्ट्रपती-छत्तीसगड**

छत्तीसगड राज्याच्या स्थापनेच्या रौप्य महोत्सवी समारंभाच्या समारोप सत्रात उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज रायपूर इथं प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यानिमित्त भारतीय वायु दलाचं सूर्य किरण एरोबॅटिक पथक आज नवा रायपूर इथं हवाई शो आयोजित करणार आहे. या दौऱ्यादरम्यान, उपराष्ट्रपती राजनांदगावला देखील भेट देणार असून तिथं ते उदयचल मल्टी-स्पेशालिटी आय इन्स्टिट्यूटचे उद्घाटन करतील तसंच लखपती दीदी परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. याशिवाय नवा रायपूर इथल्या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल काही व्यक्तींना उपराष्ट्रपतींच्या हस्ते राज्य पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

फिडेबुद्धीबळ

गोव्यातील पणजी इथं सुरू असलेल्या फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत, काल झालेल्या सामन्यात भारताचा जागतिक कनिष्ठ विजेता व्ही. प्रणव आणि अव्वल मानांकीत ग्रँड मास्टर अर्जुन एरिगासी यांनी अनुक्रमे नॉर्वे आणि बल्गेरियाच्या खेळाडूंचा पराभव करत स्पर्धेची पुढील फेरी गाठली. या स्पर्धेत आतापर्यंत एकंदर 17 खेळाडूंनी दुसरी फेरी गाठली आहे. या स्पर्धेत 82 देशांमधील 2 शे 6 खेळाडू सहभागी झाले आहेत.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार....**